# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट २९७ - २३ दिनांक : - ०२/०९/२०२३

## मसाज स्पाच्या नावाखाली वेश्याव्यवसाय चालविणाऱ्या काशिमिरातील औसम स्पावर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष - भाईंदर पथकाची कारवाई

दि.०१.०९.२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांना बातमीदारकडुन औसम स्पा, गाळा नं-६१२, स्पेस ९१२, अबोब ॲन्ड ब्रॅन्ड फॅक्टरी, प्लेझेंट पार्कसमोर, काशिमिरा, मिरारोड पुर्व या स्पाचे मालक/चालक सुमित वर्मा व मॅनेजर शबनम खान असे मसाजच्या नावाखाली पैशाच्या मोबदल्यात वेश्यागमनासाठी मुली पुरवितात.

मिळालेल्या बातमीची खात्रीकरण्यासाठी बोगस गिऱ्हाईक व दोन पंच बोलावुन सहाव्या माळयावरील औसम स्पा, गाळा नं-६१२, स्पेस ९१२, अबोब ॲन्ड ब्रॅन्ड फॅक्टरी, प्लेझेंट पार्कसमोर, काशिमिरा, मिरारोड पुर्व, या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन १७.२० वा. छापा टाकला असता, औसम स्पाचे मालक/चालक पाहिजे आरोपी सुमित अशोक वर्मा, रा. बी/४०२, हर्ष प्लाझा, शांती विदयानगरी, जीसीसी क्लबजवळ, हाटकेश मिरारोड पुर्व यांच्या संमतीने स्पा मॅनेजर शबनम खान हिने बोगस गिऱ्हाईकास ०२ मुली दाखवुन, मसाजचा मोबदला १,५००/- रु स्पा मॅनेजर शबनम खान हिने स्वीकारुन मसाज स्पाच्या नावाखाली वेश्यागमनासाठी प्रवृत्त करुन वेश्यागमनाच्या मोबदल्यात रक्कम ठरवून स्वतःच्या उपजिवीकेकरीता रक्कम ५,०००/- रु पंसत केलेल्या पिडित मुलीच्या मदतीने स्विकारल्याने स्पा मॅनेजर शबनम खान हिस सापळयातील रोख रक्कम, कंडोम व इतर मुद्देमालासह ताब्यात घेवुन ०२ पिडीत मुलीची सुटका करण्यात आली. सदर बाबत सरकार तर्फे स.फौ. उमेश हरी पाटील यांनी स्पा मालक/चालक पाहिजे आरोपी सुमित वर्मा व स्पा मॅनेजर शबनम खान यांच्याविरुध्द फिर्याद दिल्याने काशिमिरा पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. ६२९/२०२३, भा.द.वि.स कलम ३७०(२)(४), ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३, ४, ५ प्रमाणे दि.०२.०९.२०२३ रोजी गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोनि.समीर अहिरराव, स.फौ.उमेश पाटील, विजय निलंगे, रामचंद्र पाटील, पो.हवा.किशोर पाटील, पो.अं. केशव शिंदे, चा.पो.हवा. सम्राट गावडे, म.पो.अं. अश्विनी भिलारे, मसुब. अश्विनी वाघमारे सर्व नेम.अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष- भाईंदर यांनी केली आहे.

----0000----